| जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट -www.nanded.gov.in | E-mail- nandedrdc@gmail.com |
| Phone ०२४६२-२३५०७७ | Fax No- ०२४६२-२३८५०० शाखा १ महसूल - |
| क्र२०.२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१सिआर/ | दिनांक ०६.१०.२०२० |

**प्रति,**

आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड,

**विषयः-** हॉटेल/रेस्टॉरन्टस् / फुड कोट्र्स /बार मधील कामगारांची कोव्हीड-१९ ची तपासणी करणेबाबत.

**संदर्भः-** या कार्यालयाचे संचारबंदी आदेश दि.०१.१०.२०२० व दि.०४.१०.२०२०

उपरोक्त विषयी संदर्भीत नमूद आदेशान्वये दिनांक ०५.१०.२०२० पासून मा.संचालक पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई यांनी हॉटेल्स / फुड कोर्टस /रेस्टॉरन्टस् आणि बार साठी निर्गमित केलेली मार्गदर्शक प्रणालीचे तंतोतंत पालन करून ५० टक्के क्षमतेने हॉटेल्स / फुड कोर्टस /रेस्टॉरन्टस् आणि बार चालू करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

तथापि हॉटेल्स / फुड कोर्टस /रेस्टॉरन्टस् आणि बार यामध्ये प्रवेश देतांना ग्राहकाचे तापमान व थर्मल स्क्रिनिंग करूनच लक्षणे नसलेल्या ग्राहकांना प्रवेश द्यावा व लक्षणे असणा-या प्रवेश नाकारून त्या ग्राहंकाची वेगळी संपर्क तपशिलासह नोंदणी करून आरोग्य विभाग व प्रशासनास उपलब्ध करून देण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

सबब हॉटेल्स / फुड कोर्टस /रेस्टॉरन्टस् आणि बार मधील कामगारांकडून ग्राहकांना कोरोना विषाणूंची लागण होण्याची शक्यता लक्षात घेता कामगारांची कोव्हीड-१९ ची तपासणी करून घेण्यासाठी आपल्या अधिनस्त फिरते पथकामार्फत उपरोक्त नमूद आस्थापनामधील कामगारांची तपासणी करण्याचे सर्व संबंधितांना निर्देश देण्यात यावेत.

(डॉ. विपीन) भा.प्र.से.
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नांदेड

**प्रतिलीपी माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव -** १८(२) ५

१) जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड यांना कळविण्यात येते की,उपरोक्त कामगारांच्या तपासणी साठी तपासणी किट्स उपलब्ध करून देण्यात यावे.

२) श्री दिवाकर शेट्टी अध्यक्ष , नांदेड जिल्हा हॉटेल/रेस्टॉरन्टस् असोसिएशन नांदेड

३) श्री सुरेश राठोड अध्यक्ष , नांदेड जिल्हा परमिट/बार असोसिएशन नांदेड.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नांदेड

१८(२) ५